(27)

बिगर आदिवासी विभाग.

आरोग्य उपकेंद्रे स्थापन करण्याबाबत, व स्त्री आरोग्य ~~अभ्यागता~~ सहाय्यक परिचारिका प्रसाविका व अर्धवेळ सेवकांची पदे निर्माण करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांक: पीएचसी १०८५/१२९०/सीआर-४८/पीएच्-५
मंत्रालय, मुंबई - ३२.
दिनांक : २९ ऑक्टोबर, १९८५.

वाचा : सहसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे क्रमांक डीएचएस/पीडीई/एनआय/सबसेंटर/डी-७ दिनांक १४.५.८५ व दिनांक १३.८.८५चे पत्र.

निर्णय :- किमान गरजा कार्यक्रमांतर्गत ग्रामीण विभागात बिगर आदिवासी भागात ५००० लोकसंख्येसाठी व आदिवासी भागात ३००० लोकसंख्येसाठी १ आरोग्य उपकेंद्र असणे आवश्यक आहे. शासनाच्या नव्या धोरणानुसार १९८७ च्या लोकसंख्येच्या आधारावर उपकेंद्रे मंजूर करावयाची आहेत. त्याप्रमाणे १९८७ च्या ~~लोकसंख्येला~~ अनुसरुन महाराष्ट्रात १०८०० आरोग्य उपकेंद्रे स्थापन करणे आवश्यक आहे. पैकी ६३९१ उपकेंद्रे सध्या अस्तित्वात आहेत त्यामुळे ४४०९ उपकेंद्रे [सातव्या] ७ व्या पंचवार्षिक योजनेत स्थापन करावयाची बाकी आहेत. ह्यापैकी १३२० उपकेंद्रे १९८५-८६ साली स्थापन करण्याचे शासनाने ठरविले आहे.

या १३२० उपकेंद्रापैकी ९८२ उपकेंद्रे बिगर आदिवासी विभागात स्थापन करण्यास या आदेशान्वये मंजूरी देण्यात येत आहे. या उपकेंद्रांची जिल्हानिहाय वाटणी सोबतच्या "अ" तक्त्यात दाखविल्याप्रमाणे राहील.

२. या उपकेंद्रासाठी प्रत्येकी १ याप्रमाणे ९८२ सहाय्यक परिचारिका प्रसाविकांची पदे रु. २९०-१०-३८०-१५-४६५-वाढ-१५-५४० या वेतनश्रेणीत, ९८२ अर्धवेळ सेवकांची पदे रु. ५० दरमहा या वेतनावर खालील दर्शविल्या प्रमाणे मंजूर करण्यात येत आहेत.

| पदे | कोणत्या तारखेपासून मंजूर करावयाची ती तारीख |
|---|---|
| २९० | १.११.१९८५ पासून |
| १०० | १.१.१९८६ पासून |
| ५९२ | १.२.१९८६ पासून |
| ९८२ | |

...२/-

Health Department
Ratnagiri Zilla Parishad
I. No ......
26 NOV 1985

त्याचप्रमाणे ६ उपकेंद्रासाठी १ या प्रमाणात ९८२ उपकेंद्रासाठी १६३ स्त्री पर्यवेक्षकांची [स्त्री आरोग्य अभ्यागता] पदे रु. ३६५-१५-५००-२०-६६०-वाढ-२०-७६० या वेतनश्रेणीत मंजूर करण्यात येत आहेत. या पदाचे जिल्हानिहाय वाटप सोबतच्या तक्ता "ब" मध्ये दाखविल्याप्रमाणे राहील. वरील सर्व पदे प्रथमत: २८.२.१९८६ पर्यंत चालू राहतील.

३. या वरील खर्च "२८२ आरोग्य स्वच्छता व पाणीपुरवठा-ए-आरोग्य व स्वच्छता [एन] [तीन] महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ याच्या कलम १८७ अन्वये योजनांतर्गत अनुदाने केंद्र पुरस्कृत योजना मागणी क्र. १८७" या शीर्षाखाली खर्ची घालण्यात यावा व त्याखालील मंजूरीत अनुदानातून भागविण्यात यावा.

४. ही योजना केंद्र पुरस्कृत असून यावरील १०० % खर्च [बांधकामाचा खर्च सोडून] केंद्र शासनाकडून मिळणार आहे. अतिरिक्त संचालक, [कुटुंब कल्याण] पुणे यांनी खर्चाची परिपूर्ती वेळेवर होईल याची दक्षता घ्यावी.

५. हा निर्णय नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक सीआर ६१३/व्यय-१२. दिनांक २४.५.८५ ला अनुसरून काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

[ ना. ग. पंचपोर ]
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव.

प्रति,

संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
अतिरिक्त संचालक, [कुटुंब कल्याण], पुणे.
सहसंचालक, आरोग्य सेवा, [आरोग्य], पुणे.
उपसंचालक, आरोग्य सेवा, [सर्व मंडळे],
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे जिल्हा आरोग्य अधिकारी.
महालेखापाल अकौउन्टस व एनटायटलमेंट, मुंबई / नागपूर.
महालेखापाल ऑडीट मुंबई/नागपूर.

नियोजन विभाग
वित्त विभाग [व्यय-१२]
बीधुडी, सार्वजनिक आरोग्य विभाग.
पाएच्-१, सार्वजनिक आरोग्य विभाग.
पीएच्-५ निवड नस्ती, सार्वजनिक आरोग्य विभाग.
पीएच्-४, सार्वजनिक आरोग्य विभाग.

३९०/ कि. ८१

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक : पोस्वतो १०८५/१२९०/

सोआर-४८/पोएच्-५, दिनांक २९ ऑक्टोबर, १९८५ चे सहपत्र.

तक्ता " अ "

उपकेंद्राचे जिल्हा निहाय वाटप

बिगर आदिवासी विभाग.

| अनु. क्र. | जिल्हा | दिनांक १.११.१९८५ पासून | दिनांक १.१.१९८६ पासून | दिनांक १.२.१९८६ पासून | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | ठाणे | — | — | ७ | ७ |
| २. | रायगड | २२ | — | २० | ४२ |
| ३. | रत्नागिरी | ११ | — | ३५ | ४६ |
| ४. | सिंधुदूर्ग | ५० | २५ | — | ७५ |
| ५. | नाशिक | — | — | २२ | २२ |
| ६. | धुळे | — | — | ३१ | ३१ |
| ७. | जळगांव | — | — | ४१ | ४१ |
| ८. | सातारा | — | — | ४८ | ४८ |
| ९. | सांगली | ३४ | — | १३ | ४७ |
| १०. | कोल्हापूर | — | — | ५५ | ५५ |
| ११. | पुणे | ३ | २५ | १५ | ४३ |
| १२. | अहमदनगर | — | २५ | १८ | ४३ |
| १३. | सोलापूर | — | २५ | २० | ४५ |
| १४. | नागपूर | ३४ | — | २२ | ५६ |
| १५. | वर्धा | १९ | — | १९ | ३८ |
| १६. | भंडारा | — | — | १२ | १२ |
| १७. | चंद्रपूर | — | — | ३० | ३० |
| १८. | गडचिरोली | — | — | — | — |
| १९. | अकोला | ३३ | — | १७ | ५० |
| २०. | अमरावती | २१ | — | १७ | ३८ |
| २१. | यवतमाळ | ३० | — | — | ३० |
| २२. | बुलढाणा | १२ | — | ३० | ४२ |
| २३. | औरंगाबाद | ९ | — | ३९ | ४८ |
| २४. | जालना | ७ | — | २० | २७ |
| २५. | बीड | ५ | — | ३९ | ४४ |
| २६. | नांदेड | — | — | ३२ | ३२ |
| २७. | परभणी | — | — | — | — |
| २८. | उस्मानाबाद | — | — | — | — |
| २९. | लातूर | — | — | — | — |
| | एकूण : | २९० | १०० | ५९२ | ९८२ |

[कृ. मा. प.]

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक पोएचसी १०८५/१२९०/
सीआर-४८/आरोग्य-५ दिनांक २९ ऑक्टोबर, १९८५ चे सहपत्र.

## तक्ता " ब "

### स्त्री आरोग्य अभ्यागता या पदाचे जिल्हानिहाय वाटप

### बिगर आदिवासी विभाग.

| अ. क्र. | जिल्हा | १. ११. १९८५ पासून | १. १. १९८६ पासून | १. २. १९८६ पासून | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १] | ठाणे | – | – | १ | १ |
| २] | रायगड | ४ | – | ३ | ७ |
| ३] | रत्नागिरी | २ | – | ६ | ८ |
| ४] | सिंधुदुर्ग | ८ | ४ | – | १२ |
| ५] | नाशिक | – | – | ४ | ४ |
| ६] | धुळे | – | – | ३ | ३ |
| ७] | जळगाव | – | – | ७ | ७ |
| ८] | सातारा | – | – | ८ | ८ |
| ९] | सांगली | ६ | – | २ | ८ |
| १०] | कोल्हापूर | – | – | ९ | ९ |
| ११] | पुणे | – | ४ | ३ | ७ |
| १२] | अहमदनगर | – | ४ | ३ | ७ |
| १३] | सोलापूर | – | ५ | ३ | ८ |
| १४] | नागपूर | ६ | – | ४ | १० |
| १५] | वर्धा | ३ | – | ३ | ६ |
| १६] | भंडारा | – | – | २ | २ |
| १७] | चंद्रपूर | – | – | ५ | ५ |
| १८] | गडचिरोली | – | – | – | – |
| १९] | अकोला | ५ | – | ३ | ८ |
| २०] | अमरावती | ३ | – | ३ | ६ |
| २१] | यवतमाळ | ५ | – | – | ५ |
| २२] | बुलढाणा | २ | – | ५ | ७ |
| २३] | औरंगाबाद | २ | – | ६ | ८ |
| २४] | जालना | १ | – | ३ | ४ |
| २५] | बीड | १ | – | ७ | ८ |
| २६] | नांदेड | – | – | ५ | ५ |
| २७] | परभणी | – | – | – | – |
| २८] | उस्मानाबाद | – | – | – | – |
| २९] | लातूर | – | – | – | – |
| | एकूण : | ४८ | १७ | ९८ | १६३ |